महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
पहिला मजला, मंत्रालय मुख्य इमारत,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्र २२७९३८००   Email ID : deskestrev.mu-mh@gov.in

क्रमांक : आस्थाप-२०२५/१११६/प्र.क्र.३४५/मुद्रांक-१   **दिनांक : २२.०७.२०२६**

विषय :- वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळणेबाबत-
श्री. ए.एन.गायकवाड, तत्कालीन मुल्यांकन दुय्यम निबंधक

संदर्भ:- १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी २००५/९/ प्र.क्र.१/आरोग्य-३, दिनांक १९.०३.२००५.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग बैठक २०१३/प्र. क्र. ३५३/१३/ राकावि-२, दि.०४.०४.२०१४.
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.वैखप्र-२०२२/प्र.क्र.१२०/ राकावि-२, दिनांक १७.०१.२०२३.
४) वैद्यकीय अधिक्षक, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांचे पत्र क्र.जिरुउ/वै.प्र.दे./१६६५२/२०, दि.०६.०९.२०१९.
५) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.१५.०७.२०२६ रोजीच्या टिप्पणीसोबत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिव समितीच्या दि.१९.०६.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
६) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक १३.०८.२०२५ रोजीचे पत्र.

ज्ञापन:

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भ क्र. ६ येथील दिनांक १३.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, नोंदणी व मुद्रांक विभागातील श्री. ए.एन.गायकवाड, तत्कालीन मुल्यांकन दुय्यम निबंधक यांच्या पत्नीच्या "Acute myeloid leukemia" या आजारपणावरील उपचाराकरिता "युनायटेड सिग्मा हॉस्पीटल, औरंगाबाद" या खाजगी रुग्णालयात दि.२१.०८.२०१८ ते दि. २०.०९.२०१८ या कालावधीत आंतररुग्ण म्हणून घेतलेल्या उपचाराकरिता रु. ५,६०,५८९/- एवढ्या खर्चाच्या प्रतिपूर्तीचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक १७.०१.२०२३ नुसार शासनास सादर केला.

०२. श्री. ए.एन.गायकवाड, तत्कालीन मुल्यांकन दुय्यम निबंधक यांच्या पत्नीचा "Acute myeloid leukemia" हा आजार शासन निर्णय सा.आ. वि. क्र. एम.ए.जी -२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३, दि.१९.०३.२००५ भाग २ मधील अनुक्रमांक (५) मध्ये येत असल्याचे वैद्यकीय अधिक्षक, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांनी क्र.जिरुउ/वै.प्र.दे./१६६५२/२०, दि.०६.०९.२०१९ च्या पत्रान्वये प्रमाणित केले आहे.

०३. शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.वैखप्र-२०२२/प्र.क्र.१२०/राकावि-२, दिनांक १७.०१.२०२३ अन्वये रुपये ३,००,०००/- वरील परंतु रुपये ५,००,०००/- पर्यंतच्या प्रकरणांमध्ये वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजूरीचे अधिकार संबंधित विभागांच्या विभाग प्रमुखांना प्रत्यायोजित करण्यात आले असून, रुपये ५,००,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधीन राहून मंजूरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आले आहेत.

०४. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि. ०४.०४.२०१४ अन्वये गठित केलेल्या वाजवी समितीसमोर दिनांक ०२.०१.२०२६ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर समितीने दिलेल्या निर्णयानुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक वैखप्र-२०२२/प्र.क्र. ३५/राकावि-२, दि.१९.०७.२०२२ नुसार ना देय बाबींची वजाती करुन तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि. १९.०३.२००५ अन्वये देयकाची परिगणना करण्यात आली.

०५. तद्नंतर, श्री. ए.एन.गायकवाड, तत्कालीन मुल्यांकन दुय्यम निबंधक यांचे पत्नीवर उपचारार्थ झालेल्या एकूण रु. ५,६०,५८९/- इतक्या प्रत्यक्ष खर्चातून ना-देय बाबींची वजाती करून रु. ४,५७,४३०/-(रुपये चार लाख सत्तावण्ण हजार चारशे तीस फक्त) इतक्या वैद्यकीय खर्चाच्या रकमेस “एक विशेष बाब” म्हणून मंजूरी देण्याची विनंती सार्वजनिक आरोग्य विभागास करण्यात आली. सदर प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाने त्यांच्या सचिव समितीच्या दिनांक १९.०६.२०२६ रोजीच्या बैठकीत सादर केला.

०६. सदर बैठकीमध्ये श्री.ए.एन.गायकवाड, तत्कालीन मुल्यांकन दुय्यम निबंधक यांच्या पत्नीच्या “Acute myeloid leukemia” या आजारपणावरील उपचाराकरिता “युनायटेड सिग्मा हॉस्पीटल, औरंगाबाद” या खाजगी रुग्णालयात दि.२१.०८.२०१८ ते दि. २०.०९.२०१८ या कालावधीत आंतररुग्ण म्हणून घेतलेल्या औषधोपचाराचे रु. ५,६०,५८९/- एवढ्या वैद्यकीय खर्चापैकी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वाजवी समितीने दिनांक ०२.०१.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्णयानुसार औषधोपचारातील इतर व अनुज्ञेय नसलेल्या बाबी वजाती करुन तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिव समितीने दि.१९.०६.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार “एक विशेष बाब” म्हणून रु. ४,५७,४३०/-(रुपये चार लाख सत्तावण्ण हजार चारशे तीस फक्त) इतक्या रक्कमेच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस अटींच्या अधिन राहून मान्यता दिली आहे.

०७. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १९.०३.२००५ व दिनांक १७.०१.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार परिगणना तक्ता पुढीलप्रमाणे आहे :-

वैद्यकीय देयकाची परिगणना

<table>
<tr><th></th><th>कालावधी</th><th>अर्जदाराचा प्रत्यक्ष खर्च</th><th>अनुज्ञेय असणारी प्रतिपूर्तीची टक्केवारी</th><th>परिगणना करुन अनुज्ञेय रक्कम</th></tr>
<tr><td>अर्जदाराची मागणी</td><td>दि.२१.०८.२०१८ ते
दि. २०.०९.२०१८</td><td>रु. ५,६०,५८९/-</td><td>--</td><td>--</td></tr>
<tr><td colspan="5">औषधोपचारावरील खर्चाची परिगणना (वास्तव्याच्या खर्च वगळून)</td></tr>
<tr><td colspan="2">अ) (५,६०,५८९- १,०८,९७५= रु.४,५१,६१४)
I) औषधोपचारावरील अनुज्ञेय नसलेला खर्च (शासन निर्णय दि.१९.०७.२०२२ मध्ये नमूद केलेल्या नादेय बाबी वजाती केलेली रक्कम)
<table>
<tr><th>अ क्र.</th><th>तपशिल</th><th>रुपये</th></tr>
<tr><td>१</td><td>IPD enrolment charges</td><td>४००.००</td></tr>
<tr><td>२</td><td>ICU procedure</td><td>४३००.००</td></tr>
<tr><td>३</td><td>Injection charges</td><td>१७००.००</td></tr>
<tr><td>४</td><td>other services</td><td>३७००.००</td></tr>
<tr><td>५</td><td>services charges(२१.०८.२०१८-२०.०९.२०१८)</td><td>३३०००.००</td></tr>
<tr><td>६</td><td>ECG electrodes-४९४६१</td><td>१८०.००</td></tr>
<tr><td>७</td><td>B. T Set- ४९४६१</td><td>१२६.००</td></tr>
<tr><td>८</td><td>examinations gloves-४९४६१</td><td>१५०.००</td></tr>
</table></td><td>रु.४,५१,६१४.००
४९,०२५.५०

रु.४,०२,५८८.५०</td><td>९० %</td><td>रु.३,६२,३३०.००
(३,६२,३२९.६०)</td></tr>
</table>

९	Adult diapers-larg - ४९४६१	८५.००	
१०	MD bath- ४९४६१	२७९.००	
११	ECG electrodes- ४९८४१	९०.००	
१२	B. T Set- ५०१४३	१२६.००	
१३	B. T Set- ६१९८३	१३६.००	
१४	B. T Set- ५०३९९	१२६.००	
१५	Gloves- ५०३९९	५२.००	
१६	examinations gloves- ५०३९९	१५०.००	
१७	tegaderm- ५०३९९	२२४.००	
१८	Face mask- ५०४०१	१८०.००	
१९	B. T Set- ५०७५२	१३६.००	
२०	examinations gloves- ५०९४८	३०.००	
२१	Gloves - ५१३२१	५२.००	
२२	tegaderm- ५२०१३	२२४.००	
२३	Face mask less- ५१७१७	१२०.००	
२४	examinations gloves- ६४४८७	९०.००	
२५	tegaderm- ५२६४०	२२४.००	
२६	B. T Set- ६५१९१	१३६.००	
२७	examinations gloves- ६५१९१	१५.००	
२८	MD bath- ६५५०६	२७९.००	
२९	B. T Set- ५२९७४	१३६.००	
३०	MD bath- ५३६७७	२७९.००	
३१	tegaderm- ५३८९७	२२४.००	
३२	B. T Set-५४०५१	१३६.००	
३३	tegaderm- ५४१४५	२२४.००	
३४	B. T Set-५४३५९	१३६.००	
३५	B. T Set- ५४७७५	१३६.००	
३६	tegaderm- ५४९७९	२४६.००	
३७	tegaderm- ५५२७२	२४६.००	
३८	B. T Set- ५५४४५	२७२.००	
३९	examinations gloves- ५६००२	७५.००	
४०	B. T Set- ५६८९८	१३६.००	
४१	B. T Set- ५६९९७	१३६.००	
४२	examinations gloves- ५९२२४	४५.००	
४३	tegaderm- ५९२५१	२२४.००	
४४	surgical blade ११ no	४.५०	
४५	examinations gloves- ६०५३७	६०.००	
	एकूण	**रु.४९,०२५.५०**	
		एकूण (अ)	**रु.३,६२,३३०.०**

ब) आंतरबाह्य म्हणून रुग्णालयातील वास्तव्याचा खर्च					
वास्तव्याचा प्रकार	**दिनांक**	**मागणी केलेली रक्कम**	**अनुज्ञेय करण्यात आलेली रक्कम**		
१) अती दक्षता कक्ष	२१.०८.२०१८	४६५० X १ = ४६५०	४६५०	१०० %	रु. ४६५०.००
	२२.०८.२०१८ *	४६५० X ०.५ = २३२५	-	-	-
*** देयक प्रणालीमध्ये एकच तारीख गणण्यात येत असल्यामुळे दि. २२.०८.२०१८ रोजीची अर्ध्या दिवसाची रु. ४६५० दराने रु. २३२५ इतक्या रकमेची परिगणना करण्यात आलेली नाही. सदर दिनांकाची जनरल वॉर्ड मध्ये दर्शविलेली परिगणना अनुज्ञेय करण्यात आली आहे.**					
अर्जदाराने वास्त्यव्याच्या दाखल्यामध्ये जनरल वार्डाचे बाथरुम नसलेला कक्षामध्ये केवळ रु.३००० इतका दर नमूद केला आहे. तथापि मूळ देयकामध्ये सदर कक्षाचा वेगवेगळा दर असल्याचे दिसून येत आहे. कर्करोग हा गंभीर आजार पाहता मूळ देयकावरून जनरल वार्डाचे बाथरुम नसलेला कक्षाची खालीलप्रमाणे परिगणना अनुज्ञेय करण्यात आली आहे.					
२) जनरल वॉर्डचे बाथरुम नसलेला कक्ष	२२.०८.२०१८	६००० X ०.५ =३०००	३०००	९० %	रु.२७००.००
	२३.०८.२०१८ - २६.०८.२०१८	६००० X ४ =२४०००	२४०००	९० %	रु.२१६००.००
	२७.०८.२०१८	६००० X ०.५ =३०००	३०००	९० %	रु.२७००.००
		३००० X ०.५ =१५००	-	-	-
	दि.२७.०८.२०१८ रोजीचा वास्त्यव्याचा दर रु. ३००० व रु. ६००० प्रति दिन पैकी केवळ दर रु. ६००० प्रमाणे अर्ध्या दिवसाची परिगणना करून रु. ३००० इतकी रक्कम अनुज्ञेय करण्यात येत आहे.				
	२८.०८.२०१८- १९.०९.२०१८	३००० X २३ =६९०००	६९०००	९० %	रु.६२१००.००
	२०.०९.२०१८	३००० X ०.५ =१५००	१५००	९० %	रु.१३५०.००
एकूण		**रु.१,०८,९७५.००/-**			
				एकूण (ब)	**रु.९५,१००.००**
				एकूण (अ)+(ब)	**रु.४,५७,४३०**

०८. श्री. ए.एन.गायकवाड, तत्कालीन मुल्यांकन दुय्यम निबंधक यांच्या पत्नीच्या “Acute myeloid leukemia” या आजारपणावरील उपचाराकरिता दि.२१.०८.२०१८ ते दि. २०.०९.२०१८ या कालावधीत आंतररुग्ण म्हणून “युनायटेड सिग्मा हॉस्पीटल, औरंगाबाद” या खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारार्थ प्रतिपूर्तीसाठी, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिव समितीने दि.१९.०६.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार **“एक विशेष बाब”** म्हणून **रु. ४,५७,४३०/-(रुपये चार लाख सत्तावण्ण हजार चारशे तीस फक्त)** इतक्या रक्कमेच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस या ज्ञापनान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

०९. उपरोक्त प्रमाणे अनुज्ञेय ठरविण्यात आलेली वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्तीची रक्कम पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहील.

अ) मंजूर करण्यात आलेल्या प्रतिपूर्तीची रक्कम ही सर्व नियम, आदेशातील इतर सर्व इतर सर्व तरतूदींच्या अधिन राहील.

ब) प्रस्तुत प्रकरणी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्याकरीता कोणत्याही विमा कंपनीकडे दावा केलेला नाही, वा देयकाची रक्कम अन्य धर्मदाय संस्था/ट्रस्ट कडुन आहरित केलेली नाही याबाबतचे शपथपत्र (affidavit) देयकासोबत अदायगीच्यावेळी जोडणे बंधनकारक राहील.

क) वरीलप्रमाणे प्रतिपूर्तीची परिगणना करण्यात आली असली तरी महाराष्ट्र राज्यसेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील नियम क्र. ३ (आठ), ११ (१) व (२) मधील तरतुदी नुसार अंतिम रक्कम अदा करण्यापूर्वी पुन्हा एकदा देयकातील अनुज्ञेय नसलेल्या बाबींची फेरतपासणी करून अनुज्ञेय नसलेला खर्च वगळण्याची दक्षता नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी घ्यावी.

ड) सदरचा खर्च ''मागणी क्र.सी-२,२०३०-(००)(०१) नोंदणी महानिरीक्षक व जिल्हा निबंधक (अनिवार्य) - (२०३००१०९ ०१ वेतन) या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा व तो चालू आर्थिक वर्षाच्या मंजुर तरतुदीतून भागविण्यात यावा.

ई) या प्रकरणी अतिप्रदान झाल्याची बाब निदर्शनास आल्यास, मंजूर केलेली प्रतिपूर्तीची रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याचे आदेश शासन देईल.

१०. सदर शासन ज्ञापन, सार्वजनिक आरोग्य विभाग/रूशआ-२ यांच्या E-१७०१४४०, दि.२६.०६.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०२६०७२२१३०५३६३०४८ असा आहे. हे आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRACHI SUBHASH PALAV

Digitally signed by PRACHI SUBHASH PALAV
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPT, 2.5.4.20=B12A57F3F1547A8767CE0E7181ECB77647D3DA9CAC2C120C823EB1B68C07DD43, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5479AEF7E1148D256D58123C94081F8B8C9AF5CFCE5AAF933DFA4DC33E2DE372, cn=PRACHI SUBHASH PALAV
Date: 2026.07.22 13:06:44 +05'30'

(प्राची सुभाष पालव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे (मूळ वैद्यकीय देयकासह) (दोन प्रती).
२) श्री.ए.एन.गायकवाड, तत्कालीन मुल्यांकन दुय्यम निबंधक (द्वारा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे)

प्रत: **माहितीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित**

१) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखापरीक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई.
२) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे.
३) अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग (रूशआ-२), मंत्रालय, मुंबई.
४) मुद्रांक-१ कार्यासन, निवडनस्ती, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई